


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २३, जानेवारी १९४६ अंक ४

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

**—: साठे बिस्किटें :—**

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## NOTICE TO CONTRACTORS.

Separate Sealed Item rate tenders on B-2 forms are invited for the works of (1) "Special Repairs to Prince of Wales Drive of Roads in Poona (Providing a liquid Seal Coat)" estimated to cost Rs. 5,079/-. (2) Special Repairs to Poona-Sholapur road miles 41, 42, 43 and 57 estimated to cost Rs. 31,661/- and (3) Special Repairs to Poona-Sholapur road miles 66, 72, 82 and 83 estimated to cost Rs. 31,661/-.

2. Tender Forms will be issued upto the 28th January 1946, on payment of Rs. 2/- per copy and tenders received upto 2 P. M. on 30th January, 1946.

3. Earnest money of (1) Rs. 50/- (2) Rs. 320/- and (3) Rs. 320/- should be paid separately into the Treasury and chalans attached to the tenders.

4. Further particulars can be had on application to the Executive Engineer.

S. K. Karandikar,
Executive Engineer,
Poona Division.

Poona, 17th January, 1946.

THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE, LTD., POONA 2.

## NOTICE.

Notice is hereby given that the Extra Ordinary General Meeting of the Share-holders of the above Company will be held at the Tilak Smarak Mandir, Poona 2, on Sunday, the 17th day of February 1946, at 4 p. m. when the Special Resolution for the following items will be proposed.

1. A variation of the Managing Agency Agreement.
2. To increase the Authorised Capital of the Syndicate.
3. To change Article 10 of the Articles of Association of the Syndicate.

By order of the Board of Directors,

C. G. AGASHE & Co.,
*Managing Agents.*

Poona, 2.
Dated 19th January 1946.

## विविध माहिती

### असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

वरील कंपनीनें जुलै, १९४५ अखेर संपलेल्या वर्षी ६ कोटि, ८ लक्ष रुपयांची विक्री केली. निवळ नफा १ कोटि, ८६ लक्ष रुपये उरला. करासाठी ८३½ लक्ष रुपये, घसारा ४४¾ लक्ष रुपये, रिझर्व्ह फंड ५ लक्ष रुपये, वगैरे जाऊन भागीदारांस ७% डिव्हिडंड देण्यास ४९ लक्ष, ३८ हजार रुपये लागले.

### स्टॉक एक्सचेंज नष्ट करा!

"स्टॉक, बुलियन व कॉटन एक्सचेंज हीं नष्ट करण्यांत यावींत, त्यामुळें किंमती खालीं येण्यास व त्या स्थिर रहाण्यास मदत होईल व हिंदी लोकांची सट्टेबाजीपासून मुक्तता होईल" अशा अर्थाचा एक ठराव सर झिआउद्दीन अहमद मध्यवर्ति असेंब्लींत मांडणार आहेत.

### ऑस्ट्रेलियांत अंड्यांचें फाजील उत्पादन

चालू वर्षी ऑस्ट्रेलियांत अंड्यांचें फाजील उत्पादन अपेक्षित आहे. तेथें दरमाणशी वार्षिक उठाव १४० अंडीं एवढा आहे. १९४६ सालीं ११½ कोटि डझन अंडीं निघतील. ग्रेट ब्रिटन ३ कोटि डझन घेईल. बाकीचीं ८½ कोटि डझन अंडीं ऑस्ट्रेलियांत खपणार नाहींत, त्यासाठी बाहेर देशांत बाजारपेठ शोधावी लागेल. सहकारी पद्धतीनें अंड्यांची विक्री करण्यासाठी सबंद देशाकरितां एक प्रचंड योजना तेथें चर्चिली जात आहे.

### साडेतीन लाखाला रिकामे तेलाचे नळ

युद्धकाळीं ब्रह्मदेशांतून चीनपर्यंत घातलेले तेलाचे नळ अमेरिकन सरकारनें इंडिअन ट्रेड कार्पोरेशन या कंपनीला साडेतीन लाख रुपयांस विकले.

छत्रे यांचा कोल्हापुरी
संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९] मुंबई ४.

नोगींचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

### एक कोट पांच लक्ष रुपये बोनस

मजूर महाजन व अहमदाबाद येथील गिरणी मालक ह्यांच्यामध्यें झालेल्या करारानुरूप, अहमदाबादमधील एक लक्ष तीस हजार गिरणी कामगारांना एक कोट पांच लक्ष रुपये बोनस मिळणार आहे.

### साखरेचें उत्पादन खालावलें

यंदा जगांतील साखरेचें उत्पादन चार लाख टनांनीं खालावलें, असा तज्ञांचा अंदाज आहे.

### हिंदुस्थानांत व्हिस्कीची आयात

गतवर्षीपेक्षां यंदा हिंदुस्थानांत दुप्पट व्हिस्की पाठविण्याचा ब्रिटन प्रयत्न करींत आहे.

### हिंदुस्थानांत होणारी आयात

स्टर्लिंगवर आधारभूत असलेल्या देशांकडूनच शक्य तो माल आयात करावयाचें हिंदुस्थान सरकारचें सध्या धोरण आहे.

### धान्याच्या साठ्यासंबंधी माहिती

सिंध प्रांतांतील प्रत्येक बँकेनें दर महिन्याच्या पंधरा तारखेस त्यापूर्वीच्या महिन्यांत बँकेकडे आलेला, बँकेकडून गेलेला व त्या दिवशीं बँकेच्या ताब्यांत असलेला गहूं, तांदूळ, भात, ज्वारी, बाजरी, हरभरे व डाळी यांचा साठा सिंध सरकारला कळविला पाहिजे असा हुकूम प्रांतिक सरकारनें जारी केला आहे.

### शिष्टमंडळाचा खर्च

हिंदुस्थानाला सध्या भेट देत असलेल्या पार्लमेंटरी शिष्टमंडळाचा सर्व खर्च विलायत सरकार देणार आहे. हिंदुस्थान सरकारनें शिष्टमंडळासाठी फक्त एक दिवाणखाना (ऑफिस) व थोडेसे चिटणिशी खात्यांतील लोक दिले आहेत.

### बँक ऑफ इंडिया लि.

३१ डिसेंबर १९४५ रोजीं संपणाऱ्या वर्षांत बँक ऑफ इंडियाला ८३,४१,६०९ रुपयाहून अधीक फायदा झाला. सर्व कर देण्याची व्यवस्था करून बँक प्रत्येक भागीदाराला १३ टक्के डिव्हिडंड देणार आहे. यावरील इनकमटॅक्स बँक भरील. इतकें करून व नोकर लोकांना बोनस देऊन बँकेनें पुढील वर्षासाठीं १६,५९,४७१ रुपये ठेविले आहेत.

### अमेरिकन कापूस

उधार—उसनवार पद्धत बंद केल्यानंतरचा खरेदी केलेला अमेरिकन कापूस लवकरच जाऊं लागेल.

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.




सांडू प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमीटेड. (चेंबूर, मुंबई)
पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोति चौक, पुणें.




पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा



# नव्या वटहुकुमांचा उद्देश व त्याची सफलता

शंभरावरील चलनी नोटांचा कायदेशीरपणा काढून घेणारा वटहुकूम सरकारनें काढला, त्यामुळें लोकांमध्यें कमालीची चलबिचल झाली. परंतु, भारी किंमतीच्या नोटांची मोड मिळण्याची व्यवस्था जाहीर झाल्यावर, विश्वास निर्माण झाला आणि अर्जांची छाननी होईपर्यंत मोडीची वाट पहाण्याचें कारण उरलें नाहीं. अर्जांचे पुरेसे कागद तयार नसल्याकारणानें गोंधळ उडाला व कित्येकांची गैरसोय झाली. मोठ्या नोटांचा कायदेशीरपणा नष्ट झाल्यानंतरच्या, परंतु त्यांची मोड मिळण्यापूर्वीच्या मध्यंतरीच्या काळांत व्यापाऱ्यांजवळील विनिमय साधन कमी झालें. त्यामुळें कित्येक बाजार बंद ठेवावे लागले. शेड्यूल्ड बँकांमार्फतहि त्यांच्या खातेदारांस मोड मिळण्याची सोय नंतर करण्यांत आली. परंतु, खरा प्रश्न भारी किंमतीच्या नोटांचे ऐवजीं शंभराच्या नोटा मिळण्याचा नसून अर्जांत दिलेल्या माहितीमुळें अर्जदारांमागें लागणाऱ्या शुक्लकाष्ठाचा आहे. नोटांची मोड देण्यांत आल्याबरोबर त्यांच्या अर्जाची एक प्रत इनकमटॅक्स कचेरीकडे धाडण्यांत येत आहे. इनकमटॅक्स अधिकाऱ्यानें अर्जांतील माहिती ताडून पाहून, गैरवाजवी नफ्याची व कर टाळण्याची प्रकरणें उजेडांत आणावयाचीं आहेत. हें करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें विशेष हुशार अधिकाऱ्यांची योजना केली आहे, असें समजतें.

## "बैल गेला, झोपा केला"

चलनी नोटांविषयींच्या वटहुकुमाचा उद्देश फाजील चलनविस्तारास आळा घालणें, काळा बाजार थांबविणें, लांचलुचपतीचे प्रकार उघडकीस आणणें व चुकविलेला कर वसूल करणें हा आहे, हें आतां स्पष्ट झालें आहे. अर्थात्, फाजील चलनविस्तार झाला नसता तर काळा बाजार मोठ्या प्रमाणावर चालू शकला नसता व लांचलुचपतीचि प्रकारहि मर्यादित राहिले असते, हें उघड आहे. फाजील चलनविस्ताराच्या दुष्परिणामांकडे प्रो. काळे प्रभृति वीस प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं सरकारचें वेळींच लक्ष वेधलें असतां, त्याकडे सरकारनें पूर्णपणें दुर्लक्ष्य केलें हें येथें नमूद करणें आवश्यक आहे. सरकारनें ह्यापूर्वींच आपला अधिकार उपयोगांत आणावयास हवा होता, अशी वटहुकुमावर टीका होत आहे तींत तथ्य आहे. बँक ऑफ इंग्लंडनें कांहीं वर्षांपूर्वीच भारी किंमतीच्या चलनी नोटा काढण्याचें बंद केलें होतें, ही गोष्टहि येथें नमूद केली पाहिजे. युद्ध प्रयत्नांस व्यापारी व कारखानदार ह्यांचा यत्किंचितहि विरोध होऊं नये, ह्यासाठी सरकारने इतके दिवस काळ्या बाजाराकडे दुर्लक्ष्य केलें व आतां नवीन माल येऊं लागून निर्बंध उठण्याच्या सुमारास त्याच काळ्या बाजारांतील नफ्याकडे वक्र दृष्टी केली, हा प्रकार व्यापाऱ्यांस संमत नाहीं. सामान्य नागरिकांच्या दृष्टीनें "बैल गेला, झोपा केला" ह्या म्हणीप्रमाणें सरकारची दिरंगाई झालेली आहे. "गरज सरो, वैद्य मरो" अशी व्यापाऱ्यांची तक्रार आहे. अर्थात पूर्वी खबरदारी घेतली नाहीं, म्हणून आतांहि ती घ्यावयाची नाहीं, हा युक्तिवाद पटण्याजोगा नाहीं, आणि ह्या दृष्टीनेंच सरकारच्या उपाययोजनेकडे पाहिलें पाहिजे.

## वटहुकुमांची अंमलबजावणी समतोलपणानें करा

सरकारनें बँकांच्या तपासणीचा अधिकार रिझर्व बँकेस दिला आहे, त्याचाहि संबंध चलनी नोटांविषयींच्या वटहुकुमांशीं पोंचतो; कारण काळा बाजार मुख्यत भारी किंमतींच्या नोटांच्या सहाय्यानें चालला तरी बँकेंतील खात्यांची गरज भासलीच, तर खोट्या नांवानें खातीं उघडून तीं वापरलीं जातात. अशा तऱ्हेचे व्यवहार बँकांस माहित असले तर ते थांबविणें त्यांस आतां भाग पडणार आहे, कारण, नव्या वटहुकुमान्वयें कोणत्याहि बँकेची तपासणी करून अनिष्ट प्रकार थांबविण्याचा व कडक उपाय सुचविण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेकडे आला आहे. त्यामुळें बँकांतील खात्यांचा काळ्या बाजारासाठी उपयोग करणें ह्यापुढें कठीण जाणार आहे. योग्य तऱ्हेनें व्यवहार करणाऱ्या बँकांस त्यामुळें भिण्याचें कांहींच कारण नाहीं, परंतु त्यांच्या स्वायत्ततेवर होणारा आघात त्यांस सहाजीकच पसंत पडणार नाहीं. नवीन वटहुकुमांची अंमलबजावणी कसोशीनें, परंतु समतोलपणानें आणि ज्या परिस्थितींत काळा बाजार निर्माण झाला ती ध्यानांत घेऊन सरकार करील, अशी अपेक्षा आहे. गुन्हा करणाऱ्या व्यापाऱ्यांबरोबर लांचलुचपतीवर श्रीमान झालेल्या अधिकाऱ्यांसहि नव्या वटहुकुमाखालीं समान पातळीवर न्याय मिळाला, तर कोणासच तक्रारीस जागा नाहीं. लांचलुचपतीचे प्रकार व काळा बाजार ह्यांचा निकटचा संबंध लक्षांत घेऊनच सरकारनें पाऊल टाकलें असेल हें उघड आहे.

## अन्न-परिस्थिति जरा गंभीरच आहे

हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव ह्यांनीं कराची येथील एका मुलाखतींत हिंदी अन्न परिस्थितीची चर्चा केली व प्रत्येक प्रांतांतील परिस्थिती त्यांनीं समजावून सांगितली. अन्न-परिस्थिति जरा बिकट झाली असल्याचें त्यांनीं कबूल केलें व गहूं आणि तांदुळ ह्यांची आयात होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. सयाममधील १५ लक्ष टन तांदळाच्या सांठ्याचा कांही वाटा मिळविण्यासाठीं अन्न खात्याचे चिटणीस सर रॉबर्ट हचिंग्ज हे अमेरिकेस गेले आहेत. त्यांच्या मागणीस ब्रिटिश सरकार पाठिंबा देत आहे, अशी त्यांनीं माहिती दिली. हिंदी उत्पादनाच्या मानानें सयाममधील उपलब्ध पुरवठा फारच अल्प आहे आणि त्याचा अंश हिंदुस्थानास मिळाला नाहीं तरी चालेल असें वॉशिंग्टनमधील कंबाइन्ड बोर्डाचें म्हणणें आहे. तेव्हां सर रॉबर्ट ह्यांच्या तरफदारीवर बरेंच अवलंबून आहे. चालू वर्षी हिंदुस्थानास बराच गहूं मिळणार आहे. लोकांना ऑस्ट्रेलियाचा गहूं कॅनेडियन गव्हापेक्षां जास्त मानवेल अशी अपेक्षा आहे. प्रांतिक सरकारें शक्य तितका साठा जास्तींत जास्त काळ पुरविण्याचा प्रयत्न करीत आहेतच. पंजाब, सिंध, इत्यादि प्रांतांत त्यांच्या स्वतःच्या गरजेपेक्षां अधिक धान्य तयार होतें, तें तुटीच्या प्रांतांना मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यासाठी सर ज्वालाप्रसाद प्रयत्न करणार आहेत. रेशनिंग दीर्घकाल टिकणार हें सांगायला नकोच.

## नोटेची रकम बिनशर्त देवविण्याची हायकोर्टांत मागणी

जोसेफ मायकेल डिसोझा ह्यांनीं रिझर्व बॅन्केस १००० रुपयांची नोट सादर केली परंतु "बँकेनें मागणी करतांच, बिनशर्त त्याची रकम देण्याचें बेकायदा नाकारलें; कोणताहि डिक्लरेशन फॉर्म भरून देण्याची आपणावर कायदेशीर जबाबदारी नाहीं. १९३४ च्या रिझर्व बँक कायद्यानें बँकेवर टाकलेली जबाबदारी १२ तारखेस अंमलांत आलेल्या वटहुकुमानें नाहींशी होत नाहीं, तेव्हां स्पेसिफिक रिलीफ ॲक्टच्या ४५ कलमाप्रमाणें बिनशर्त १००० रु. देण्याचें बँकेस भाग पाडण्यांत यावें" असा अर्ज डिसोझा ह्यांनीं मुंबई हायकोर्टाकडे केला. २१ जानेवारी ही तारीख अर्ज ऐकण्यासाठी ठरविण्यांत आली.

दाव्याचें काम सोमवारीं न संपल्याकारणानें तें मंगळवारीं पुढें चालू झालें.

# १९४५ मधील शेअर बाजाराचें सिंहावलोकन

प्रथम जर्मन युद्धाचा शेवट व नंतर ऑगस्टमध्यें जपानी युद्धाची परिसमाप्ति या महत्त्वाच्या घटनांनीं शेअर बाजाराच्या दृष्टीनें १९४५ साल अत्यंत महत्त्वाचें ठरलें. १९४५ चे बजेटांत विशेष महत्त्वाचे नवे कर आले नाहींत व लढाई संपणार या भावनांनीं वेचाण बरीच जमली होती त्यामुळें बाजार प्रथम खालीं गेलेले पुन्हा वरती झटकन येऊं शकले. मध्यंतरीं जुलैमध्यें मजूर सरकार इंग्लंडमध्यें स्थापन झालें व त्यामुळें उद्योगधंदे राष्ट्रीय करण्याचा संभव उत्पन्न होऊन बँक ऑफ इंग्लंड प्रत्यक्ष राष्ट्राच्या मालकीची करण्याबद्दलची योजनाही जाहीर झाली.याचा परिणाम म्हणून जवळ जवळ सप्टेंबर अखेर बाजार विशेष हालचाल न करतांच पडून राहिले होते. सरकारी कागद मात्र मजबूत राहाण्या-कडे प्रवृत्ति झाली होती. वाढलेलें चलन लक्षांत घेऊन जेव्हां सरकारनें एक पांच वर्ष मुदतीचें केवळ २॥ टक्यांचें कर्ज काढलें तेव्हां तर ३॥ टक्के कागद १०३ पर्यंत जुलैमध्यें चढला होता. यांत सट्टेबाजांचाही बराच हात होता व त्याचा परिणाम पुढें भाव १००-८ पर्यंत घसरला तेव्हां त्यांना भोगावा लागला. यानंतर मात्र हा कागद हळूहळू चढत चढत काल-परवा नवें २३/४ टक्याचें कर्ज जाहीर झालें तेव्हां १०४ पर्यंत येऊन ठेपला आहे व तो तसाच मजबुती दाखवील असें वाटतें. इतर रोखे याच प्रमाणांत एकंदरीनें मजबुतींत होते. १९५९–६१ रोखा सरकार विकण्याचें बंद करील या भावनेवर विशेष घेतला जात होता व अजूनहि त्याची लोकप्रियता कमी झालेली दिसत नाहीं ? १९७०–७५ रोखा हा सुद्धां पुढें पुढें येऊं लागला आहे. कारण सध्यां शेअर्समध्यें झालेल्या तेजीचा फायदा घेऊन मोकळे केलेले पैसे तात्पुरते ठेवण्याचे दृष्टीनें तो सोईचा पडत आहे.

## गेल्या दोन महिन्यांतील तेजी

लढाईचा शेवट होऊन मंदी येणार या भावनेवर नरम राहिलेले बाजार ऑक्टोबर अखेर एकदम जागे झाले व या सर्व वर्षाची खरी करामत बाजारानें नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्यांत दाखविली व अभूतपूर्व भाव दाखविले. या जोराच्या खेळाला मुख्य हातभार कलकत्त्यानें लावला. स्टील कॉर्पोरेशन ऑफ बंगालचे अध्यक्ष सर बिरन मुकर्जी यांनीं कंपनीचें उत्पादन एक-दोन वर्षांत दुप्पट वाढेल हें जाहीर करतांच तो झपाट्यानें ३४–३५ वरून चढूं लागला व त्याबरोबर इंडियन आयर्न कमी व्याज देऊन सुद्धां त्याच्या पुढें धाऊं लागला व या दोन महिन्यांत ४१ वरून परवा ५९–१२ पर्यंत चढला. बेंगाल स्टील जानेवारी ७ ला ४९–१२ झाला होता व सध्या ४८ ला स्थिर दिसत आहे. टाटा डिफर्ड व ऑर्डिनरी जे २३००–२४०० व ४२०–३० भावांत विकून टाकावेत म्हणून प्रमुख दलाल सांगत होते ते १९४६ च्या सुरवातीस अनुक्रमें २७९५ व ४९९ पर्यंत चढले व अजूनहि २७६० व ४९० च्या भावांत (८-१-४६) मजबुती दाखवत आहेत. या तुफान तेजींत मंदीवाल्यांनीं १९३७ सालीं खाल्ला होता तसा मार खाल्ला.

## तेजीचीं कारणें

या तेजीला जीं कारणें झालीं ती ४ महिन्यापूर्वी होतीं तीच. पण टाटाचे डायरेक्टर जॉन मथाई व ए. डी. श्राफ आणि सर व्हिक्टर ससून यांनीं आपल्या उद्योगधंद्यांना पुढील कांहीं वर्षे भरभराटीची जावींत अशीं काढलेलीं पत्रकें कारणीभूत झालीं. तेजीचीं कारणें थोडक्यांत अशीं सांगतां येतील व सध्यां बाजारांतील रट-फ करणाऱ्याच्या तोंडी आहेत. ती हीं कीं, (१) लढाई संपल्यामुळें जादा प्राप्तीवरील कर जाणार (२) त्यामुळें कंपन्या जास्त व्याज देऊं लागणार (३) त्याबरोबरच सरकारनें अडकविलेल्या कंपन्यांच्या मोठाल्या रकमा परत होऊन बोनस शेअर मिळणार (४) बँकेचा दर कमी होणार (५) सरकारी रोख्यावर २-२॥ टक्केच सुटतात तर शेअरवर ४-५ टक्के करमाफ सुटतात (६) चलन सारखें वाढतच आहे (७) इंग्लंडमधील उद्योगधंदे राष्ट्रीय होणार म्हणून तिकडचे गुंतविणारे इकडे आले आहेत (८) हिंदी उद्योगधंद्यांना कोणतीही चढाओढीची भीति राहिली नसून आपण उलट परदेशांना माल पाठवूं शकूं (९) मंदीवाल्याचे गळे अडकले गेले आहेत (१०) फलाचा फलाणा चांगला तेजीला आहे (११) लोक जादा कर यावा लागेल म्हणून डिलिव्हरी देत नाहींत. आणखी सुद्धां सांगतां येतील. पण येवढीं पुरे. इतकी कारणें दाखविल्यावर कोठलेही शेअर मागें रहाणें शक्य नव्हते. दोनच महिन्यांत १० लाख रुपये नुकसानी दाखविणारा टाटा केमिकल १६–१० वरून २८ वर चढला.

वर दिलेल्या तेजीच्या कारणांत सत्यता आहे हें कबूल केलें पाहिजे पण त्याबरोबरच हेही सांगणें भाग आहे कीं तेजीच्या मागें मोठाल्या सटोडियांचा हात आहे व ते बाजाराला केव्हां सोडून देतील याचा पत्ता लागणार नाहीं. कर कमी होणार का, तें येणाऱ्या बजेटावरून दिसेलच. युद्धोत्तर विकास योजना अजून कागदावरच आहेत व आमची यंत्रसामुग्री परमावधीच्या निकृष्ट अवस्थेला पोचली असून नवीन सामुग्री २ वर्षे मिळणें कठीण आहे. झालेली तेजी सुव्यवस्थित नसून बेदरकार अशी आहे व अशा तेज्या फार काळ टिकत नाहींत असा अनुभवच आहे. नवीन गुंतविणारे या भावांत पुढें येत नसून येवाळी फक्त सटोडियांचीच आहे. हिशेबी व गुणाकार करून व्यवहार करणारे मूर्ख ठरले आहेत व त्याच्याखालीं विकल्यामुळें हात पोळला आहे व सध्यातरी ते गप्प बसलेले दिसत आहेत. सर्व भाव गगनाला भिडविणार म्हणून तेजीवाल्या सटोडियांचा विडा आहे.

## १९४६ संबंधीं अपेक्षा

अशा रीतीनें १९४५ साल शेवटच्या दोन महिन्यांतील तेजीमुळें संस्मरणीय ठरलें. पूर्वी वरच्या भावांत अडकलेल्या मंडळींना मोकळे होण्यास संधी आलेली असून ते ती घेतील यांत संशय नाहीं. नवीन सालापासून व्याजें जास्त वाढतील अशी आशा करण्यास जागा दिसत नाहीं. मजूर अर्थमंत्री डॉ. डाल्टन यांनीं जादा कर कमी करतांना कंपन्यांना जास्त डिव्हिडंड वाटूं दिलें जाणार नाहीं असें ध्वनित केलेलेंच आहे. इकडे काँग्रेस सत्ता-प्रविष्ट झाली तरी तेंच धोरण निश्चित आखील असें वाटतें. कामगार वर्ग असंतुष्ट असून संप चालू आहेत व बेकारी निश्चित वाढणार आहे. मुख्य म्हणजे स्टर्लिंग शिलकेचा मोठा भाग कागदावरच खर्ची टाकला जाईल असा संभव उत्पन्न झाला आहे व चलन-विकास थांबवण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितींत लोकांनीं विकून टाकून पैसे सेव्हिंग बँक अथवा सरकारी कागदांत गुंत-विणें श्रेयस्कर वाटतें. तेजीच्या मागें आतां धांवणें हानिकारकच होईल. सटोडियांनीं पैसे मिळविलेले घालविले तर त्यांचे त्यांना. ज्यांना पुंजी राखणें जरूर आहे त्यांनीं तिकडे लक्ष न दिलेलें बरें.

ता. ८।१।१९४६ व. वि. लोणकर

# स्फुट विचार

## बँकांची तपासणी करण्याचा रिझर्व्ह बँकेस नवा अधिकार

कोणत्याहि बँकेची तपासणी करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस देणारा एक वटहुकूम हिंदुस्थान सरकारनें ता. १५ रोजीं काढला आहे. ह्या तपासणीचा रिपोर्ट रिझर्व्ह बँकेनें सरकारास केल्यावर सरकार त्याचा विचार करील. ठेवीदारांच्या हितसंबंधास बाधक होईल अशा रीतीनें एखाद्या बँकेचा कारभार चालू आहे अशी सरकारची खात्री पटल्यास उपाय योजना करण्याचा अधिकार वटहुकूमानें त्यास दिला आहे. नवीन ठेवी स्वीकारण्यास बंदी, शेड्यूल्ड बँकांत नांव दाखल करण्यास नकार, अगोदरच शेड्यूल्ड बँकांच्या यादींत असल्यास यादींतून हकालपट्टी, हीं त्या योजनेचीं अंगें होत. मध्यवर्ती असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनांत हिंदुस्थान सरकारनें एक व्यापक बँकिंग बिल मांडलें होतें व असेंब्लीनें तें सिलेक्ट कमिटीकडे सोपविलें होतें. परंतु असेंब्ली आतां अस्तित्वांतच नसल्याकारणानें सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट नव्या असेंब्लीपुढें येऊं शकणार नाहीं आणि नवें बिल मंजूर होऊन त्याची अंमलबजावणी होण्यास बराच कालावधि लागेल. बँकांची झपाट्यानें वाढ होत गेली, त्याचे कांहीं दुष्परिणाम दिसून आले आहेत त्यास तात्काळ आळा घालून बँकिंगचा धंदा संक्रमण काळांत सुरक्षित राखणें आवश्यक झालें आहे; म्हणून बँकिंग बिलांतील तपासणी बाबतचीं कलमें आतां वटहुकूमाचे स्वरूपांत अंमलांत आणण्यांत येत आहेत. असा सरकारचा खुलासा आहे. बँकिंग बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें, म्हणजे प्रस्तुत वटहुकूम मागें घेण्यांत येईल.

---

## वटहुकूमच काढला, तर ह्या पूर्वींच कां नाहीं ?

रिझर्व्ह बँकेस ४२ व्या कलमानें देखरेखीचे अधिकार दिले होते ते अपुरे होते, रिझर्व्ह बँकेनें दिलेला सल्ला मानण्याची जबाबदारी शेड्यूल्ड बँकांवर नव्हती व कलमांत नमूद केलेल्या माहितीव्यतिरिक्त इतर माहिती मागण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार नव्हता. त्याबाबत बँकिंग बिलांत सुधारणा सुचविण्यांत आली होतीच. कोणत्याहि बँकेची, केवळ शेड्यूल्ड बँकेचीच नव्हे, तपासणी करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस वटहुकूमानें दिला आहे. बँकिंग बिलांतील कित्येक कलमांवर लोकांनीं तीव्र टीका केली होती, परंतु तें बिल निदान असेंब्लीच्या मंजुरीनें तरी कायदा बनणार होतें. लेखणीच्या फटक्यासरशीं नवे अधिकार रिझर्व्ह बँकेस देण्यांत येत आहेत, ह्यामुळें तक्रारीस आणखी एक सबळ कारण निर्माण झालें आहे. हिंदी बँकिंगच्या सर्व्या प्रगतीस पोषक होतील अशा सुधारणा करण्याचें मात्र लांबणीवर पडलें आहे. मूळ बिलाचा उद्देशच देशाचें व्यापक हितसंवर्धन हा नसून ठेवीदारांचें हितरक्षण एवढाच होता. तेव्हां प्रस्तुत वटहुकुमाचें क्षेत्र मर्यादित असणें स्वाभाविक आहे. नियंत्रणासाठी सरकारास वटहुकूम काढतां येतो, परंतु सर्व्या व्यापक सुधारणांचा मात्र विचार सरकार करीत नाहीं, अशी वटहुकुमावर टीका होत आहे. सरकारला वटहुकूम काढूनच चौकशीचे अधिकार रिझर्व्ह बँकेस द्यावयाचे होते, तर तो काढण्यांत सरकारनें एवढी दिरंगाई कां केली ? बँकांच्या कारभारांतील सरकारास वाटणाऱ्या अनिष्ट बाबी आज नव्यानें चालू झालेल्या नाहींत; बराच काळ सुरूच आहेत. मग, त्यावर उपाययोजना वेळींच कां केली नाहीं ? आणि इतका काळ थांबल्यावर असेंब्लीची बैठक अगदी जवळ आली असतांहि तिची वाट पाहण्यास सरकार तयार झालें नाहीं, हें चमत्कारिक दिसतें.

---

## लोकसंख्येच्या शर्यतींत रशिया अग्रेसर

पाश्चिमात्य देशांतील लोकसंख्या गेलीं १५० वर्षें एकसारखी वाढत गेली, परंतु ती वाढ आतां थांबली आहे. प्रत्यक्ष अमेरिकेंतील लोकसंख्येसहि २५ वर्षांचे अवधींत स्थिरपणा प्राप्त होईल. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, वगैरे देशांची लोकसंख्या निम्म्यावर येण्याचा संभव आहे. युरोपांतील प्रमुख देशांपैकी एकट्या रशियाचीच लोकसंख्या अद्याप वाढत आहे. त्याची लोकसंख्या १९७० चे सुमारास २५ कोटींचे घरांत जाईल असा तज्ञांचा अंदाज आहे. २५ ते ३३ वर्षांचे तरुण पुरुष लष्करांत दाखल होतात. ह्या हिशेबानें रशियाचें लष्करी बळ ३½ कोटि सैनिकांचें होईल. म्हणजे तें त्याच वेळच्या अमेरिकेच्या सैनिक बळाच्या दुप्पट व ग्रेटब्रिटन, फ्रान्स, जर्मनी व इटली ह्यांच्या संयुक्त बळापेक्षां ४०% अधिक होईल. केवळ मनुष्यांच्या लोकसंख्येनें राष्ट्र प्रबळ होत नाहीं, हें चीन व हिंदुस्थान ह्यांच्या उदाहरणावरून सिद्धच आहे. ह्या दोन्ही देशांची लोकसंख्या प्रत्येकीं सुमारें ४० कोटि आहे. ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या फक्त ७० लक्ष असली तरी ४ कोटि लोकसंख्येच्या जावा देशापेक्षां तो खचित प्रबळ आहे. हिंदुस्थानास प्रभावी बनवायाचें असल्यास, त्यानें आपलें आर्थिक बळ आधीं वाढविलें पाहिजे. युरोपांतील देश आपली लोकसंख्या वाढविण्याचे प्रयत्न करीत आहेत. रशिया बहुपुत्री मातांचा सन्मान करून मुलांच्या शुश्रूषेकडे लक्ष पुरवितो. जर्मनीनें व इटलीनें स्त्रियांस बहुसंख्य अपत्यें होणें आर्थिक दृष्ट्या फायदेशीर केलें व अनौरस संततीवरील काळीमा नाहींसा केला. फ्रान्स बाहेरील लोकांचें आपल्या देशांत स्वागत करीत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळें नामर्द झालेल्या पुरुषांत फ्रेंच सरकार मर्दाई निर्माण करण्यासाठीं टेस्टोस्टरोन वाटीत आहे असें प्रसिद्ध झालें आहे. रशियाच्या लोकसंख्येची वाढ व त्याचें औद्योगिक वाढतें बळ ह्यांची इतर देशांना कशी भीति वाटत आहे, ह्याची वरील माहितिवरून कल्पना येईल.

---

## संरक्षणाची मुदत वाढवा

साखर, कागद, रेशमी माल, लोखंड, पोलाद, इत्यादींवरील संरक्षक जकातींची मुदत ३१ मार्च, १९४६ रोजीं संपत आहे. उद्योगधंद्यांस द्यावयाच्या संरक्षणाची चौकशी युद्धकाळांत तहकूब ठेवून संरक्षणाची मुदत सालोसाल वाढविण्यांत येत होती. आतां युद्ध संपलें असलें, तरी उद्योगधंद्यांची परिस्थिति अद्याप स्थिर झालेली नाहीं आणि त्यांस किती व किती काळ संरक्षण देण्यांत यावें, ह्याची चौकशी करण्याजोगी स्थिति नाहीं. तेव्हा ह्यासंबंधांत शंका राहूं नये, ह्यासाठीं सरकारनें सध्या इतकेंच संरक्षण तीन वर्षें चालू ठेवण्याची घोषणा सत्वर करावी, अशी सूचना श्री. एम. पी. गांधी ह्यांनीं केली आहे. त्या सुमारास परिस्थिति निवळेल व टारिफ बोर्डाची चौकशी वास्तवतापूर्ण होईल, अशी त्यांची अपेक्षा आहे. सरकारास तीन वर्षें जरी नाहीं तरी कांहीं काळ तरी संरक्षण चालू ठेवावें लागेल, असें दिसतें.

---

## मोठ्या चलनी नोटा रद्द करण्याबाबतचे सरकारी धोरण

लेखकः—श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी., सातारा

सरकारकडून जाहीर करण्यांत आलेल्या खुलाशावरून पहिले दोन वटहुकुम काढण्याचा मुख्य उद्देश म्हणजे काळा बाजार करणाऱ्या व इनकमटॅक्ससारखे कर चुकविणाऱ्या इसमांचा सुगावा लावणें हा होय. कारण सरकारी कल्पनेप्रमाणें ज्यांनीं काळा बाजार करून भरमसाट पैसा मिळविला आहे अशा लोकांनीं असा पैसा स्वतःजवळ मोठ्या नोटांत ठेवला असला पाहिजे. कारण अशा पैशाचा जमाखर्च ठेवणें अगर बँकेंत ठेवणें म्हणजे त्या वरील टॅक्स चुकविणें कठीण होईल व काळा बाजार उघडकीस येईल. तसेंच ज्यांनीं (विशेषतः सरकारी अधिकाऱ्यांनीं) लांचलुचपतीचे मार्गानें पैसा मिळविला असेल त्याचाही वरील प्रमाणेंच सुगावा लागण्याची शक्यता आहे असें सरकारी मत आहे. तिसऱ्या वटहुकुमाचा उद्देश म्हणजे बँकांत पैसा ठेवणारांचें हिताचें रक्षण करणें हा होय. नवीन ब्यांकिंग कायदा होणेंस् जरा अवधि लागेल म्हणून दरम्यानचे काळांतील ही व्यवस्था होय. यामुळें बँकांचे डायरेक्टर्स कर्जे वगैरे कोणास देतात, त्यांस तारण भरपूर आहे काय वगैरे बाबत रिझर्व्ह बँकेचें लक्ष इतर बँकांकडील व्यवहारावर राहील. .

### वटहुकुमांची आतां जरूरी आहे काय ?

सरकारला जर खरोखरीच वरील उद्देश साधावयाची सदिच्छा होती तर त्यास अशा वटहुकुमांची काय जरूरी आहे ? व आतां युद्ध संपल्यावर जागें होऊन आपला हेतू सरकार साध्य करूं शकेल काय ? वास्तविक रीत्या जेव्हां काळ्या बाजाराला अगदी ऊत आला होता व त्यामुळें हजारों लोक मृत्युमुखीं पडत होते त्याच वेळीं सरकारनें जरूर ती उपाय योजना करणें जरूर होतें. ब्रिटिश व इतर पाश्चिमात्य राष्ट्रांनीं त्या वेळीं आपापल्या देशांतील मोठ्या चलनी नोटा रद्द केल्या. हिंदुस्थान सरकारनें मात्र त्यावेळीं फक्त रुपये हजार व दहा हजारच्या नोटा बदलतांना बदलणाऱ्याचें नांव घेण्याची रिझर्व बँकेमार्फत नोटीस काढली. अशा वेळीं पुष्कळ नोटा बदलल्या व सरकार मात्र स्वस्थ बसलें. गुप्त पोलिस खात्यामार्फत काळा बाजार व लांचलुचपतीस आळा घालण्याचा सरकार प्रयत्न करीत होतें पण हे प्रकार बंद होण्या ऐवजीं जास्तच वाढले. आणि आतां युद्ध संपून काळा बाजारवाले व टॅक्स चुकविणारे अस्ते अस्ते कमी होत असतांना सरकार जागें झालें. रोगी मरून स्मशानांत गेल्यावर डाक्टर आणण्यापैकींच हा प्रकार आहे. पंडित जवाहरलाल नेहरूसारख्या पुढाऱ्यांनीं म्हटल्याप्रमाणें अशा लोकांना फाशीचीच शिक्षा दिली पाहिजे. पण सरकारनें वटहुकुमाद्वारें टाकलेलें पाऊल या बाबतींत कितपत यशस्वी होईल याची मात्र शंका आहे.

### हिंदुस्थान व इतर देश

इतर देशांशीं तुलना करतांना हिंदुस्थान हा बँकिंगचे धंद्याचे बाबतींत अद्यापी फार मागें आहे, त्याचें कारण मुख्य म्हणजे अशिक्षितपणा होय. व त्यामुळें लोकांना अद्याप बँकिंगची संवय लागावयाची आहे. त्यामुळें बरेंच लोक जवळच फार शिल्लक ठेवतात. उलट ब्रिटनसारख्या देशांत बहुतेक व्यवहार बँकांचे मार्फत चालतात व लोकांचे जवळ शिल्लक अगदी थोडी असते. अशी परिस्थिति असतांना ब्रिटनसारख्या देशांत सुद्धां जेव्हां मोठ्या नोटा रद्द केल्या तेव्हां लोकांना त्या बदलण्यास कांहींहि अटी न घालतां भरपूर वेळ दिला. हिंदुस्थानांत मात्र उलट स्थिति झाली आहे. लोकांना नोटा बदलण्यास वेळ अगदी थोडा व अर्जदारानें भरावयाचे अर्जांतील माहिती पाहिली व नोटा बदलणाऱ्यावर घातलेल्या अटी पाहिल्या म्हणजें अन्याय झाला असें वाटल्यावांचून रहावत नाहीं. यामुळें गरीब म्हणजे ज्यांनीं खरोखरच न्यायानें पैसा मिळवून जवळ ठेवला असेल अशा लोकांचें नुकसान होईल, कारण असे लोक अर्जांतील अटी वगैरेंचा त्रास चुकविणेसाठी गप्प बसतील अगर नोटांची अन्य मार्गें व्यवस्था लावतील. काळा बाजार व लांचलुपत करणारे अनुभवी मात्र सुटण्याचा प्रयत्न करतील व पुन्हां सभ्यतेनें हिंडूं लागतील.

### १०० रु. नोटाहि कां रद्द केल्या नाहींत?

तेव्हां आतांच हे वटहुकूम काढून सरकारला घाई करण्याचें कारण नव्हतें. अगदी गुप्त चौकशीनें या गोष्टी, काळाबाजार व लांचलुचपत उघडकीस आल्या असत्या. तसेंच जर मोठ्या नोटा रद्द करावयाच्या होत्या तर त्यांत (निदान तूर्त तरी) रु. १०० च्याहि नोटा घालण्याची जरूरी होती. कारण ज्यांनीं दहा-वीस हजार रुपये लांचलुचपतींत मिळविले (व अशांची संख्या जास्त असणें शक्य आहे) अशा लोकांचे जवळ स्वभाविकच असल्यास रु. १०० च्याच जास्त नोटा असणें शक्य आहे. पण सरकारनें तेंहि केलें नाहीं. सरकारनें आतांच घिसाडघाई करण्याची जरूरी नव्हती. लोकनियुक्त असेंब्लीनें हा प्रश्न जास्त विचारपूर्वक हाताळला असता. एकंदरींत हे वटहुकुम, विक्रीकर अगर रेल-रोड-को-आर्डिनेशनच्या प्रांतिक योजना पाहिल्या म्हणजे लोकप्रतिनिधींच्या राज्यकारभारास सुरवात कशा अडचणींत होणार आहे ह्याची कल्पना येईल.

---

### रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा व त्यांचें तारण.

११—१—४६

| | |
|---|---|
| इश्यू खात्याची जिंदगी = एकूण चलनी नोटा | रु. |
| अ. सोनें व सोन्याचीं नाणीं:— | |
| हिंदुस्थानांतील सांठा | ४४,४१,४५,००० |
| हिंदुस्थानाबाहेरील सांठा | ... |
| स्टर्लिंग रोखे | ११,२०,२२,८९,००० |
| अची बेरीज | ११६४,७४,३४,००० |
| ब. रुपयाचीं नाणीं | १३,३४,५८,००० |
| हिं. सरकारचे रुपयांतील रोखे | ५७,८४,१५,००० |
| हुंड्या व इतर पतपत्रिका | ... ... ... |
| एकूण जिंदगी (चलनी नोटांची एकूण रकम) | १२,३५,९३,०७,००० |

ह्या आठवड्यांत चलनी नोटांत सुमारें ९ कोटि रुपयांची भर पडली. नोटांच्या तारणासाठी स्टर्लिंग रोख्यांत सुमारें तेवढीच वाढ झाली.

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७३८२

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा (xd)
असो. सीमेंट रु. ७-०-० दि. १४—१-४६
बेलापूर रु. ८-०-० दि. १५—१-४६
सिंप्लेक्स रु. ४-८-० दि. १४—१-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १४।१।४६ | मंगळवार १५।१।४६ | बुधवार १६।१।४६ | शुक्रवार १७।१।४६ | सोमवार २१।१।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २६४२—८ | २५२७-८ | | | |
| ४८०; ३०२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४७८—० | ४५७-८ | | | |
| २२२९-८; १७६१-१२ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २१६५-० | २१३२-८ | | | |
| ७०२; ५६६ | ९—-० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६८९-८ | ६६२-० | | | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७५९-० | ७१५-० | | | |
| ४४३-८; ३६० | ९-०-० S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ४४५-० | ४२२-० | | | |
| ३३१-८; २७५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३३७-० | ३१४-० | | | |
| | ५-०-० † | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३४५-० | ३२५-० | | | |
| ३३७; २४३ | ४-०-० † | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३५२-०+ | ३३१-८ | | | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-१३-० | ४-८-६ | | | |
| १७.१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७-१२-० | १६.१२-० | | | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—८-० | ३-३-६ | | | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७६१—४ | ७३२-८ | | | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २४४-०+ | २३३-४ | | | |
| २५६; २१३-८ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५५ | ४४०-०+ | | | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६३२—८ | ६०५-५ | | | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४३—९ | ४२-२ | | | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—९ | १०३-० | | | |

बुधवार दि. १६-१-४६ पासून दि. २१ पर्यंत बाजार बंद राहिला होता.
मंगळवार दि. २२-१-४६ पासून बाजार दुपारीं १२ ते ३ पर्यंत चालू आहे.

### चलनी नोटा

भारी चलनी नोटांची मोड मिळण्याची मुदत वाढवून ती आतां २६ जानेवारी, १९४६ अखेर करण्यांत आली आहे.

रिझर्व बँकेच्या मुंबई कचेरीनें रविवारीं सुद्धां अर्जदारांच्या नोटा घेऊन त्यांस मोड दिली.

अर्जीतील माहिती भरण्यासाठी इनकमटॅक्स तज्ञांचा सल्ला घेणें कित्येक अर्जदारांस आवश्यक वाटलें.

कलकत्ता येथील एका पेढीनें २० लक्ष रुपयांच्या भारी किंमतीच्या नोटांचा तपशील आपल्या अर्जात दिला आहे.

चलनी नोटांसंबंधींच्या वटहुकुमाप्रमाणें वटहुकूम बहुतेक संस्थानांनीं काढले आहेत.

नोटा बदलून घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या मुसलमान अर्जदारांचे अर्ज भरून देण्याची व्यवस्था मुंबई येथील प्रांतिक मुस्लिम लीगनें केली आहे.

### पोस्ट खात्याची वाढ

दोन हजार वस्तीच्या प्रत्येक खेड्यास पोस्ट ऑफिस, पांच हजारांच्या प्रत्येक गांवास तार ऑफिस व तीस हजारांच्या प्रत्येक शहरास टेलिफोन एक्सचेंज, अशी पोस्ट व तार खात्याची वाढ करण्याची हिंदुस्थान सरकारची १५ वर्षांची योजना आहे.

### मुंबई प्रांतासाठी सिंधचा तांदूळ

सिंध प्रांतांत नको असलेला २ लक्ष टन तांदूळ कमी तांदूळवाल्या प्रांतांना विकत देण्यांत येणार आहे. यापैकीं ८५ हजार टन तांदूळ त्रावणकोर दरबारला देण्यांत येईल. कोचीनला ३५ हजार टन तांदूळ मिळेल. मुंबई इलाख्याच्या वांटणीस १२ हजार टन तांदूळ येईल. याशिवाय मुंबई इलाख्याला ४५ हजार टन तांदूळ पंजाबमधून मिळून ६८ हजार टन तांदूळ मध्य प्रांतांतून मिळेल.

### मुंबईच्या गिरण्या जुन्या पुराण्या झाल्या आहेत

ब्रिटिश पार्लमेंटरी शिष्टमंडळांतील एक सभासद् मि. बॉरमले ह्यांनीं मुंबई शहरांतील गिरण्या पाहिल्यावर "ह्या गिरण्या लँकेशायरच्या गिरण्यांचे तीस वर्षे पाठीमागें आहेत असे उद्गार काढले. अमेरिकन गिरण्यांचे पुष्कळच मागें ब्रिटिश गिरण्या आहेत तेव्हां मुंबईच्या गिरण्यांची अमेरिकन गिरण्यांशीं तुलनाच करावयास नको.


## NOTICE TO CONTRACTORS

Sealed Item rate tenders on B–2 form are invited for the work of "Constructing an additional Store Room at the Head Quarter Police Lines at Bhamburda" estimated to cost Rs. 5857 approximately.

2. Tender forms will be issued upto 28th January 46 on payment of Rs. 2/– and tenders received upto 3 p. m. on 30th January 1946.

3. Earnest money of Rs. 59/– should be paid into Treasury and the chalan attached to the tender.

4. Further particulars can be had on application to the Undersigned.

B. P. PALANDE,
Deputy Engineer
Govt. House Sub-Division.

Poona, 19th January 1946.

ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

## ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

---

## पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

---

लहान मुलांकरितां

## आर्को

गोड —एरंडेल— वापरा

: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

---

## ठेवी घेणें आहेत

### श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर

अधिकृत भांडवल १५ लाख
खपलेलें भांडवल ८॥ लाख

मिल्सची एकूण जिंदगी रु. १० लाखांची असून, मशिनरी रु. ६ लाख, इमारत रु. ३ लाख व कच्चा-पक्का माल रु. १ लाखाचा आहे. गिरणीसाठी आणखी मशिनरी खरेदी होत असून चात्याहि वाढविण्यांत येणार आहेत.

कंपनीच्या वाढत्या व्यापासाठी ठेवी घेणें आहेत. व्याजाचा दर १ वर्ष ५ टक्के, २ वर्षे ५॥ टक्के.

माहितीपत्रक व ठेवीच्या अर्जाचा नमुना मागवा

पायोनियर डाइंग हाऊस,
८१४ सदाशिव, पुणें २.

---

प्रगतिपथावरील नवा

## मै ला चा — द ग ड

सन १९४४ मधील प्रगति

नव्या कामांत ७० टक्के वाढ
खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

### दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

---

## बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
मायखळा पुल, नं. १७ मुंबई.

---







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.